स्थायी समितीच्या **गुरुवार** दिनांक 28–10–2010 रोजी दुपारी 12–30 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## <u>उपस्थित सभासद</u>

| | | |
|---|---|---|
| **1.** | **श्री. संदिप दिवाकर जोशी** | **अध्यक्ष** |
| 2. | सौ. अरुणा जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| 3. | श्री. रवींद्र डोळस | सदस्य |
| 4. | श्री. दिपक चौधरी | सदस्य |
| 5. | श्रीमती ममता ठाकुर | सदस्या |
| 6. | श्री. दिपक पटेल | सदस्य |
| 7. | श्री. शेषराव गोतमारे | सदस्य |
| 8. | श्रीमती शोभा पटेल | सदस्य |
| 9. | श्री. सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 10. | श्री. राजेश श्रीनिवास माटे | सदस्य |
| 11. | श्री. दिपक दयाराम पेंदाम | सदस्य |
| 12. | श्री. किशोर गजभिये | सदस्य |
| 13. | श्री. संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 14. | श्री. मधुकर नत्थुजी कांबळे | सदस्य |
| 15. | श्री. सतिश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 16. | श्री. राजेश रामचरण जरगर | सदस्य |

## <u>उपस्थित अधिकारी</u>

1) श्री. विष्णुपद बुटे, अपर आयुक्त

2) श्री. रविन्द्र पागे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 305</u> :– वार्ड क्र. 72, महाविर वार्ड येथे टांगा स्टॅंड चौक ते निकालस मंदिर पर्यंत 150 मी.मी. व 100 मी.मी. व्यासाची सी. आय. पाईप लाईन टाकण्याच्या कामाकरिता जाहिरातीद्वारे निविदा बोलविल्या असता, एकूण प्राप्त दोन निविदांपैकी, मे. ए.आर.सिंग कंन्स्ट्रक्शन कंपनी यांची निम्नतम दराची 0.63 टक्केने कमी रु. 14,06,830/– ची निविदा स्विकारण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 306</u> :– वार्ड क्र. 82, मधील शिवाजी नगर उद्यानामधे प्रकाश व्यवस्थेत सुधारणा करण्याकरीता रु. 11,36,500/– च्या प्राकलनास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली..

<u>ठराव क्रमांक 307</u> :– वार्ड क्र. 131, मधे विविध ठिकाणी खांब लावून प्रकाश व्यवस्था करण्याकरीता रु. 30,00,000/– च्या प्राकलनास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 308</u> :– वार्ड क्र. 100, मधे हायमास्ट लावून प्रकाश व्यवस्था करण्याकरीता रु. 15,75,300/– च्या प्राकलनास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यामध्ये वार्ड क्र. 100, 127 व 131 सह दुरुस्ती करुन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 309</u> :– नागपूर शहरातील पथदिव्यांच्या दुरुस्तीकरीता लॅम्पस् चोकस् व इग्नेटर्स इत्यादी साहित्य खरेदी करण्याच्या कामाकरीता ई–निविदा बोलाविल्या असता प्राप्त निविदांपैकी मे. बजाज इलेक्ट्रीकल्स लि., मे. क्रॉम्टन ग्रीव्हज लि. मे. सुर्या रोशनी लि. मे. ओसराम (इंडिया) प्रा. लि. व मे. विप्रो लि. यांचे प्राकलनीय दरांच्या तुलनेत 0.0% ते 0.75% ने कमी दर असलेले सुधारीत निविदा दर मंजूर करुन शक्यतो समप्रमाणात आवश्यकतेनुसार रु. 85,00,000/– पर्यंत खर्च सिमीत ठेऊन या साहित्याच्या पुरवठा करवून घेण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 310</u> :– वार्ड क्र. 135 मधील शाहू नगर, एकमत नगर, गीता नगर, बाळकृष्णनगर व इतर ठिकाणी प्रकाश व्यवस्था करण्याकरीता रु.

12,99,600 /– च्या प्राकलनास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली..

<u>ठराव क्रमांक 311</u> :– वार्ड क्र 93 रेशीमबाग उद्यानात विविध स्थापत्य कामाच्या रुपये 14,94,630 /– च्या प्राकलनास तसेच या कामाकरीता वास्तूविशारद श्री. उमेश पाटील यांची निर्धारित दरानूसार वास्तूठरावक सेवा घेण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली..

<u>ठराव क्रमांक 312</u> :– वार्ड क्र. 26, पांढराबोडी, बोहरा कब्रस्थान व कमला निवास ते हनुमान मंदिर पर्यंत रस्त्याचे डांबरीकरणास्तव रु.14,99,840 /– राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन पाठराबेवाडी या दुरुस्ती सह यास एकमताने मंजूरी प्रदान केली..

<u>ठराव क्रमांक 313</u> :– वार्ड क्र. 73, जुनी मंगळवारी येथील चांदेकर मोहल्ला ते माता मंदिर ते बौध्द विहार स्विपर कॉलनी पर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निम्नतम निविदाकार मे. एल. सी.गुरुबक्षानी, यांची प्राकलनीय दरापेक्षा 5.49 टक्के कमी दराची रु. 12,37,265/– राशीची निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 314</u> :– वार्ड क्र. 44 , पंचशिलनगर, कृष्णा नगर येथे संरक्षक भिंत बांधण्याचे कामास्तव रु.14,99,200/– राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली..

<u>ठराव क्रमांक 315</u> :– वार्ड क्र. 132 , आशिर्वादनगर भागातील ताजबाग शहेनशाह चौक ते रिंग रोड (व्दारका कॉम्प्लेक्स ) पर्यंतच्या रस्त्याचे खडीकरण , फुटपाथ , नाली व डांबरीकरण करण्याचे उर्वरित कामास्तव रु.85,91,796/– राशीचे पद क्र. 681 मधून प्रावधान उपलब्ध करणे तसेच या कामाचे कंत्राटदार मे. एस.के. गुरुबक्षानी, यांचे मंजूर दरानुसार कार्यादेश निर्गमित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन पद क्र. 681 च्या जुन्या देण्यातुन रु. 15, पर्यंत कार्यादेश सिमीत ठेवण्याच्या अटीवर एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 316</u> :– वार्ड क्र. 32 , डेप्टी सिग्नल भागातील वेगवेगळया वस्त्यांमधील रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिट पेव्हमेंट करण्यास्तव रु.

14,99,716/— राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली..

**ठराव क्रमांक 317** :— वार्ड क्र. 64 , क्रॅडक रोड श्री.गुप्ता यांचे घरापासून पाचपावलेश्वर मंदिर ते पिवळी मारबत चौक ते जागृतेश्वर मंदिर पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरणाचे कामास्तव 14,99,200/— राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली..

**ठराव क्रमांक 318** :— वार्ड क्र. 33 , येथे कुत्तेवाले बाबा मठ आणि मारवाडी वाडी जवळ रामसुमेर नाल्याची भिंत बांधणे व दुरुस्ती करण्यास्तव रु.19,99,850/— राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 319** :— वार्ड क्र. 98 , हसनबाग बडी मस्जीद जवळ आणि नंदनवन ले—आऊट परिसरात पेव्हमेंट (आय — ब्लॉक) चे कामास्तव रु.14,98,453/— राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 320** :— वार्ड क्र. 98 , हसनबाग कब्रस्थान जवळील नाल्याचे बांधकामास्तव रु.11,98,607/— राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 321** :— वार्ड क्र. 135 , सेवादलनगर व नाईकनगर येथील प्रथम चरण रस्ता व डांबरीकरणाचे कामास्तव रु. 14,99,770/— रकमेच्या प्राकलनास वित्तीस मान्यतेसह, प्रशासकीय मान्यता देणे व निविदा बोलविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली..

**ठराव क्रमांक 322** :— नागपूर म.न.पा. च्या प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळेतील वर्ग 1 ते 12 मधील एकूण 2,92,778 विद्यार्थ्यांकरिता खालील प्रमाणे नोटबुक खरेदी करावयाचे प्रस्तावित आहे.

1) नोटबुक 1 रेघी 200 पेजेस

2) नोटबुक 2 रेघी 200 पेजेस

3) नोटबुक 4 रेघी 200 पेजेस

4) रजिस्टर 200 पेजेस

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे खरेदी करण्यास्तव ई–निविदा मागविण्यात आल्यात. याप्रमाणे चार पुरवठादार यांनी प्रतिसाद दिला. व नोटबुकचे सॅम्पल सादरकेले तथापि, निम्नत्तम दर ($L_1$) चे पुरवटादार मे. श्लोक मार्केटिंग नागपूर व तिसऱ्या क्रमांकावर ($L_3$) चे पुरवठादार मे. गुरूकृपा स्टेशनर्स मार्ट नागपूर यांचे सॅम्पल चा कागद व नोटबुकची बांधणी वेगवेगळया पद्धतीची आहे. यामुळे प्रशासकीय मंजुरीन्वये समिती गठीत करण्यात आली व नोटबुक विकत घेण्याबाबतचा दर्जा विचारार्थ घेऊन अहवाल सादर करण्यात आलेला आहे. तथापि, समितीच्या अहवालानुसार दोन्ही पुरवठादार यांनी सादर केलेल्या निविदाप्रमाणे कोणतीही बदल करण्यास तयार नाही, असे कळविले आहे. यामुळे निम्नत्तम दराप्रमाणे खरेदीची शिफारसीप्रमाणे मे. श्लोक मार्केटिंग नागपूर यांचे नोटबुक व रजिस्टर दर खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| 1) नोटबुक 1 रेघी 200 पेजेस | रू. 9.27 प्रती नग |
| 2) नोटबुक 2 रेघी 200 पेजेस | रू. 9.27 प्रती नग |
| 3) नोटबुक 4 रेघी 200 पेजेस | रू. 9.27 प्रती नग |
| 4) रजिस्टर 200 पेजेस | रू. 19.47 प्रती नग |

उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे एकूण 2,90,754 नग नोटबुक व 2024 नग रजिस्टर असे एकूण नग 2,92,778 खरेदीकरिता एकूण रूपये 27,34,696 /– (अक्षरी सत्ताविस लक्ष चौतिस हजार सहाशे छयाहान्नव फक्त ) च्या येणाऱ्या खर्चास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन निम्तम निविदाकार यांनी दिलेल्या अर्जावर योग्य निर्णय घेण्याचे अधिकार निगम आयुक्त यांना देण्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

सदर खर्च पद क्र. 593 मधून करण्यात येईल.

<u>ठराव क्रमांक 323</u> :– म.न.पा. ची रिक्त व बंद असलेली यशवंतराव चव्हान प्राथमिक शाळा वार्ड क्र. 103 सोमवारीपेठ, नागपूर या इमारतीची यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (नाशीक) विभागीय केंद्र नागपूर या संस्थेने मागणी केलेली आहे. या विभागीय केंद्रामुळे नागपूर व विदर्भातील विद्यार्थ्यांना लाभ

होणार आहे. नागपूर विभागीय केंद्रा अंतर्गत एकूण 3500 अभ्यास केंद्रामधून विविध शिक्षणक्रमातून दरवर्षी 3 लक्ष विद्यार्थ्या प्रवेश घेत आहे. याद्वारे 245 प्रमाणपत्र, पदविका, पदवी व पदव्युत्तर शिक्षणक्रम या संस्थेतर्फे कार्यान्वित करण्यात येत आहे. प्रस्तावित शाळेची दिर्घ मुदतीकरीता मागणी केलेली आहे. म.न.पा. चे हनुमान नगर क्षेत्रिय कार्यालय झोन क्र. 3 यांच्या रेंट चार्ट नुसार सदर इमारतीचे मासीक भाडे रु. 49207.00 इतके आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (नाशीक) विभागीय केंद्र नागपूर यांनी महानगरपालिकेने ही जागा व इमारत विभागीय केंद्राला विनामुल्य व अल्पशः मोबदल्यात दिल्यास मुक्त विद्यापीठ आपल्या दैनंदिन कार्याशिवाय यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ व महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक कर्मचारी व महानगरपालिका सुचवेल अशा नागरीकांसाठी खालील उपक्रम कार्यान्वित करेल व महानगरपालिकेला कोणताही आर्थिक भार वहन करावा लागणार नाही असे नमुद केले आहे.

1) म.न.पा.तील कर्मचारी, शिक्षक व त्यांच्या परिवारासाठी विनाशुल्क गरजांवर आधारीत शिक्षणक्रम, 2) प्रस्तावित विभागीय केंद्राच्या परिसरातील युवकांसाठी कौशल्यावर आधारीत व्यवसायीक शिक्षणक्रम व संगणक प्रशिक्षणाची स्थापना, 3) विभागीय केंद्राच्या परिसरात सुसज्ज वाचनालय, 4) महानगरपालिकेच्या शाळामधील शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी विशेष प्रकल्प, 5) महानगरपालिकेतील प्राथमिक शिक्षकांसाठी विद्यापीठाच्या बी.एड. अभ्याक्रमातील प्रवेशास प्राधान्य, 6) आभासी केंद्राच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांच्या विशेष प्रशिक्षणाची सोय

तरी उपरोक्त विद्यापीठाने नमुद केलेल्या अटी व म.न.पा. च्या प्रचलित अटी व शर्ती नुसार सदर संस्थेने मान्य केलेली यशवंतराव चव्हान प्राथमिक शाळा वार्ड क्र. 103, सोमवारीपेठ, नागपूर ही 3 वर्षाच्या भाडे तत्वावर देण्याचा प्रश्न विचारात घेवून किंवा दिर्घ मुदतीसाठी विचारात घेतल्यास म.न.पा. सभागृहाची परवानगी घेणे आवश्यक राहील. प्रस्तावित ठरावास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन मासिक भाडे रु. 1/– प्रति चौ.फुट. प्रमाणे आकारण्यास तसेच तीन वर्षाच्या भाडे पट्टयावर देण्यास एकमताने मंजूरी प्रदान करण्यात येते, तसेच तीन वर्षाच्या भाडेपट्टयाचे कर्यालयाकडून कार्यान्वीकरण व करारनामा आणि अर्जदारास ताबा दिल्यावर, उपरोक्त प्रस्ताव दिर्घ मुदतीच्या मान्यतेसाठी सभागृहाच्या मंजुरी करीता पाठविण्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 324</u> :– रामबाग स्लम वस्ती, वार्ड क्र. 90 येथे घरोघरी नळ योजने अंतर्गत जलवाहीनी टाकण्याच्या कामाच्या रु. 49,58,262.00 चे प्राकलनीय खर्चास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 325</u> :– वार्ड क्र. 7, येथील यादव नगर, महेन्द्र नगर या भागात 100 मी.मी. व्यासाची डी. आय. पाईप लाईन टाकण्याचे कामाकरीता ई– निविदा बोलाविली असता प्राप्त दोन निविदापैकी मे. एच. जे. जिभकाटे यांची प्राकलनीय दराचे तुलनेत सहा टक्के कमी दराची रु. 10,09,417/– ची निम्नतम निविदा मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 326</u> :– वार्ड क्र. 33, करुणानगर, हनुमान नगर भागात व मुदलीयार ले–आऊट मध्ये सीवर लाईन टाकण्याचे कामास्तव रु. 11,99,980/– राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली..

<u>ठराव क्रमांक 327</u> :– बजेरीया वार्ड क्र. 68, येथील विविध रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव रु. 14,99,392/– राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली..

<u>ठराव क्रमांक 328</u> :– वार्ड क्र. 76, किल्ला येथील तुळशीबाग विहारातील रस्त्यांच्या डांबरीकरणाच्या कामास्तव रु. 14,99,725/– राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली..

<u>ठराव क्रमांक 329</u> :– वार्ड क्र. 3, संघर्ष नगर येथे सी.सी. पेव्हमेंटचे कामास्तव रु. 15,00,000/– राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली..

<u>ठराव क्रमांक 330</u> :– रेशिमबाग मैदान येथे कविवर्य सुरेश भट सभागृहाचे बांधकाम करण्यास्तव रु. 33,59,30,869/– चे प्राकलनास मंजूरी प्रदान करण्याचा व या मधिल स्थापत्य स्वरुपाचे रु. 23,51,81,250/– रक्कमेचे कामास्तव निविदा बोलाविण्याचा, तसेच या कामास्तव वास्तुशिल्पकार मे. अशोक मोखा यांना म.न.पा. चे प्रचलित मंजूर दरांवर प्रकल्प व्यवस्थापकिय सल्लागार नेमण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 331</u> :– वॉर्ड क्र. 34, प्रेमनगर परिसरातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे करण्याचे कामास्तव रु. 14,98,780/– राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 332</u> :– दहा नंबर ब्रिज चौक, दारोडकर चौक, आंबेडकर चौक, मेंहदीबाग 'टि' पॉईन्ट, सुभाषनगर 'टि' पॉईन्ट, नंदनवन जंक्शन आणि विकास इन्टरप्राईजेस चौक वर वाहतुक सिग्नलची पुर्नरचना (LED base with Battery Back up & Timer इत्यादी सह) करण्या करीता एकूण रुपये 48,10,000/– च्या प्राकलनास प्रशासकीय आणि ई–निविदा बोलविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 333</u> :– नविन प्रशासकीय इमारतीचे फर्निचरचे काम मॉडयुलर फर्निचरद्वारे लघू निविदा काढून स्वतंत्र करणेबाबत. मा. स्थायी समिती ठराव क्र. 236 दिनांक 28.01.2010 अन्वये निर्णय झाला.

दिनांक 07.05.2010 रोजी मा. महापौर, मा. आयुक्त, व पदाधिकाऱ्यांची महापौर कक्षात सदर ठरावांवर चर्चा झाली. कारपेन्ट्री फर्निचरचा व मॉडयुलर फर्निचरचा वापर व उपयोगानुसार त्याची विभागणी करावी. व 40 : 60 चा प्रमाणात फर्निचर घेण्याबाबत निर्णय झाला.

वापर व उपयोगानुसार, कारपेन्ट्री फर्निचर व मॉडयुलर फर्निचरचे अंदाजपत्रक तयार केले असता कारपेन्ट्री 58 टक्के व मॉडयुलर फर्निचर 42 टक्के असे प्रमाण येते.

मा. स्थायी समिती ठराव क्र. 236 दिनांक 28.01.2010 चा निर्णयात यामुळे बदल होत असल्यामुळे मा. स्थायी समितीच्या पुर्नविचारार्थ व यथायोग्य आदेशास्तव सादर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 334</u> :– वॉर्ड क्र. 14, येथे सिंगल सीटेड शौचालयाचे बांधकामास्तव रु. 30,00,000/– राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 335</u> :– मिडल प्रिन्सिट पार्क, सी.ए. रोड येथील "स्वर्ण जयंती स्मारक" चे उर्वरीत बांधकाम करण्याकरीता श्री. एस. जे. शर्मा यांची प्राकलनीय राशीपेक्षा 6.60% कमी असलेली रु. 50,80,026/– ची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.